ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 8 | APRIL - 2026

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील रमाबाई आंबेडकर यांचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास



आयु. विनोद किसन आखाडे
संशोधक विद्यार्थी , पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर
डॉ संजय गायकवाड
मार्गदर्शक, इतिहास् विभाग प्रमुख मा. ह .महाडिक कला व वाणिज्य महाविद्यालय मोडनिंब

**Abstract**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राष्ट्रनिर्मितीचे प्रमुख शिल्पकार आहेत; परंतु त्यांच्या जीवनकार्याच्या पाठीशी उभ्या असलेल्या रमाबाई आंबेडकर यांच्या योगदानाचा स्वतंत्र ऐतिहासिक अभ्यास तुलनेने कमी आढळतो. रमाबाईंचे जीवन हे त्याग, संयम आणि संघर्षाचे प्रतीक होते. अत्यंत प्रतिकूल सामाजिक, आर्थिक आणि कौटुंबिक परिस्थितीत त्यांनी बाबासाहेबांना मानसिक व नैतिक आधार दिला. बाबासाहेबांच्या परदेशातील शिक्षणकाळात आणि सामाजिक चळवळींच्या कठीण टप्प्यांमध्ये रमाबाईंनी संसाराची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. त्यांच्या त्यागामुळेच बाबासाहेबांना शिक्षण, संशोधन आणि सामाजिक कार्यासाठी संपूर्णपणे समर्पित होता आले. प्रस्तुत संशोधन लेखात रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनाचा ऐतिहासिक संदर्भात अभ्यास करून राष्ट्रनिर्मिती प्रक्रियेत त्यांच्या अप्रत्यक्ष पण प्रभावी योगदानाचे विश्लेषण करण्यात आले आहे. स्त्री-अभ्यासाच्या दृष्टीने रमाबाईंच्या भूमिकेचे पुनर्मूल्यांकन करणे हा या लेखाचा उद्देश आहे.

**Key Word**

रमाबाई आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रनिर्मिती, स्त्रीशक्ती, सामाजिक न्याय, दलित चळवळ, ऐतिहासिक अभ्यास, त्याग, सामाजिक परिवर्तन

## प्रस्तावना

भारतीय राष्ट्रनिर्मितीचा इतिहास लिहिताना संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. सामाजिक न्याय, समता आणि घटनात्मक मूल्यांची स्थापना या कार्यांमुळे त्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. तथापि इतिहासाच्या पानांमध्ये त्यांच्या जीवनातील कौटुंबिक आधारस्तंभ असलेल्या रमाबाई आंबेडकर यांचे योगदान महत्वाचे आहे

इतिहासात महान पुरुषांच्या कार्याचा गौरव केला जातो; परंतु त्यांच्या यशामागील स्त्रीचे योगदान अनेकदा दुर्लक्षित राहते. रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनाचा अभ्यास केल्यास राष्ट्रनिर्मितीत स्त्रीच्या अप्रत्यक्ष भूमिकेचे महत्त्व स्पष्ट होते.

“ भारतरत्न आणि घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू कोड बिल मांडून महिलांना अधिकार देण्याचा प्रयत्न केला. महिलांचे अधिकार आणि सबलीकरण याचा विचार त्यांनी मांडला. त्यांच्या या विचारामागे माता रमाई यांची प्रेरणा होती. डॉ.आंबेडकर यांच्या जीवनात रमाई यांचे खूप मोठे योगदान असून रमाई यांचे जीवन प्रत्येक भारतीय महिलेसाठी प्रेरणादायी आहे” राष्ट्रपती रामनाथ कोविंद

## संशोधनाची उद्दिष्टे

1. रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनाचा ऐतिहासिक आणि सामाजिक संदर्भात अभ्यास करणे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्यात रमाबाईंच्या योगदानाचे विश्लेषण करणे.
3. राष्ट्रनिर्मितीत स्त्रीच्या अप्रत्यक्ष भूमिकेचे ऐतिहासिक मूल्यमापन करणे.
4. रमाबाईंच्या त्याग आणि संघर्षाचे स्त्री-अभ्यासाच्या दृष्टीने पुनर्मूल्यांकन करणे.

### संशोधन पद्धती

या संशोधनासाठी ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. दुय्यम स्रोतांमध्ये चरित्रग्रंथ, आत्मचरित्रात्मक लेखन, संशोधन निबंध आणि शासनप्रकाशित दस्तऐवजांचा आधार घेतला आहे. उपलब्ध साहित्याच्या तुलनात्मक अभ्यासातून निष्कर्ष मांडले आहेत

### विवेचन

### रमाबाईं आंबेडकर कौटुंबिक पार्श्वभूमी

रमाईंचा(भागीरथी ) जन्म 7 फेब्रुवारी 1898 रोजी दापोली जवळील वणंद या गावी झाला. भिकू वलंगकर. त्यांच्या कुटुंबात आई-वडिलांसोबतच त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यातील मोठ्या बहिणीचे लग्न झाले होते. रमाबाई लहान असतानाच त्यांची आई व पाठोपाठ पित्याचेही निधन झाले. त्यामुळे लहान वयातच रमाबाई यांच्याकोवळ्या मनावर मोठा आघात झाला.यानंतर त्या आपल्या काका व गोविंदपूरकर मामा यांच्यासोबत मुंबईतील चाळीत राहायला गेले. भावंडांसोबत आपला काका व मामांसोबत राहू लागल्या( डॉ बाबासाहेब आंबेडकर उर्फ भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड १ चा. भ. खैरमोडे तत्कालीन समाजात त्यावेळी बालविवाह प्रथा रूढ होती. त्यामुळे त्यांचा विवाह लहानपणीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबर करण्यात आला होता. रमाबाई व भीमराव आंबेडकर यांचे लग्न भायखळ्याच्या भाजी हबीबमार्केटमध्ये 4 एप्रिल 1906 रोजी झाले. (बाबांची रामू ज.वि. पवार पान १७ )लग्नाच्या वेळी भीमराव आंबेडकर 14 वर्षांचे तर, रमाबाई या 9 वर्षांच्या होत्या.

काय घडणार आहे कोणालाच माहीत नव्हतं. एवढं खरं की रमा एका वादळात सापडली होती. तिच्या पदराची गाठ एका तुफानाशी बांधली गेली होती. वादळ नेईल तिकडे तिला जावं लागणार होतं. रमा आता वादळाची सावली झाली होती. सूर्याची ती सावली झाली होती. सूर्यासाठी सावली झाली होती; पण स्थिती अशी होती की हे वादळालाही माहीत नव्हतं. सावलीलाही माहीत नव्हतं. सूर्यालाही ते अज्ञात होतं. त्याच्यासाठी झालेल्या सावलीलाही ते अज्ञात होतं. सगळेच निर्णय भविष्याच्या काळोखानं दडवून ठेवले होते.रमा सुभेदारांची सून झाली होती आणि वलंगकर हे आडनाव बदलून ती आता आंबेडकर झाली होती. रमाचा संसार सुरू झाला ( मी रमाई : यशवंत मनोहर )

लग्नानंतर वर्ष 1907 मध्ये भीमराव मॅट्रिक झाले. त्यानंतरच बाबासाहेबांचा सामाजिक व शिक्षणाचा प्रवास सुरू झाला. साधारण वर्ष 1923 पर्यंत शिक्षण आणि चरितार्थासाठी नोकरी अशा निमित्ताने बाबासाहेब सतत बाहेर असायचे. बाबासाहेब आपली पत्नी रमाबाईंना प्रेमाने रामू म्हणून हाक मारत असत. त्यांनी रमाबाईंना लिहायला, वाचायला शिकवले होते. बाबासाहेब विलायतेत असताना रमाबाई त्यांना स्वतः पत्र लिहीत असत व त्यांची आलेली पत्रे वाचीत असत.

बाबासाहेब आणि रमाई यांना यशवंत, गंगाधर, रमेश, इंदू(मुलगी) व राजरत्न अशी एकूण पाच अपत्य झाली . यशवंतखेरीज इतर चार अपत्ये त्यांच्या वयाची दोन वर्षे पूर्ण होण्याच्या आतच दगावली. यशवंत हा एकमेव त्यांचा वंशज रमाईंचा संसारही संघर्षमय होता. त्यांनी आपल्या संसारिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दुःख, गरिबी यावर मात केली. बाबासाहेबांबरोबर संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी पार पाडल्या. भोगलेल्या कष्टाचे व दुःखाचे कधी भांडवल केले नाही. स्वत: गवऱ्या थापून त्यांनी संसार चालविल मोठा मुलगा यशवंतराव यांचा जन्म 12 डिसेंबर 1912 रोजी झाला. त्यावेळी भीमराव मुंबईच्या बीआयटी चॉल, पोयबावाडी परळ येथे कुटुंबासमवेत राहत होते. डॉ. भीमराव आंबेडकर जानेवारी 1913 मध्ये बडोदा राज्य सैन्यात लेफ्टनंट म्हणून नेमणूक झाल्यावर बडोदाला गेले, परंतु वडील रामजी सकपाळ यांच्या आजाराच्या आजारमुळे लवकरच मुंबईला परतावे लागले. रामाबाईंच्या दिवसरात्र सेवा व उपचारानंतर त्यांचे निधन 2 फेब्रुवारी 1913 रोजी घडले. वडिलांच्या निधनानंतर भीमराव उच्च शिक्षणासाठी परदेशात गेले. ते 1914 ते 1923 पर्यंत सुमारे 9 वर्षे परदेशात राहिले.

बाबासाहेब अमेरिकेत होते तेव्हा रमाबाईंनी खूप कठीण दिवस घालवले. रमाबाईंनी या कठीण काळातही कोणतीही तक्रार न करता मोठ्या संयमाने हसून दिवस काढले.

डिसेंबर 1940 मध्ये बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांनी "थॉट्स ऑफ पाकिस्तान" हे पुस्तक लिहिले आणि ते केवळ त्यांची पत्नी "रामू" यांना समर्पित केले.

‘‘तिच्या अंत:करणाचा चांगुलपणा: तिच्या मनाचा उथासपणा; तिच्या चरित्र्याचा निष्कलंकपणा; त्याचप्रमाणे ज्यावेळी कोणी मित्र उरला नसता. आणि आमच्या पोटा पाण्याच्या विवंचनेचा काळ होता. असे दिवस आम्हा दोघांच्या वाट्याला आले असता जिने ते दिवस मूकपणाने सहण केले व माझ्या बरोबर ते दुःख सहन केले आणि मज बरोबर तसले ही दिवस काढले म्हणून तिच्या वरील सद्गुणांची आठवण देण्यासाठी हा ग्रंथ तिच्या स्मृतीस अर्पण करीत आहे.

'पाकिस्तानची फाळणी' या इंग्रजी ग्रथांच्या प्रथम पृष्ठावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वरील अर्पण पत्रिका लिहिली आहे. तिच रमाईच्या कार्याची पावती आहे.

’’७ फेब्रवारी १८९८ ते २७ मे १९३५ हा अवघा ३७ वर्षाचा रमाईचा जीवन प्रवासत्यांचा संघर्ष फक्त इतिहास नाही, तो आजच्या स्त्रियांसाठी प्रेरणा आहे.

### शिक्षणकाळातील त्याग व योगदान

बाबासाहेबांना उच्च शिक्षणासाठी कोलंबिया विद्यापीठ (अमेरिका) आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स (इंग्लंड) येथे जाण्याची संधी मिळाली. या काळात घरातील जबाबदारी पूर्णपणे रमाबाईंवर आली. आर्थिक मदत मर्यादित होती. मुलांचे संगोपन, घरखर्च आणि सामाजिक दडपण या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी एकहाती सांभाळल्या.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी बाबासाहेबांच्या शिक्षणाला कधीही अडथळा आणला नाही. उलट त्यांना प्रोत्साहन दिले. अनेक मुलांचे आजारपण आणि मृत्यू ही त्यांच्यासाठी मोठी दुःखद घटना होती; तरीही त्यांनी खंबीरपणे परिस्थितीचा सामना केला. या त्यागामुळेच बाबासाहेबांना अखंडितपणे शिक्षण पूर्ण करता आले.

जेव्हा रमाईंना कळलं की बाबासाहेबांना लंडनमध्ये पैशांची अडचण आहे. तेव्हा त्यांनी बाबासाहेबांना14 रुपयांची मनी ऑर्डर पाठवली. मला वाटतं, आपल्या नवऱ्याला विदेशात मनी ऑर्डर पाठवणारी ती पहिली बायको असावी. त्यांचं मूल वारलं पण त्यांना या गोष्टीची जाणीव होती की जर आपण आता दुःखात बुडालो आणि स्वतःला सावरलं नाही तर साहेबांचं शिक्षण पूर्ण होणार नाही आणि त्यामुळे त्यांची ज्या समाजासाठी काम करण्याची इच्छा आहे ती पूर्ण होणार नाही."

## सामाजिक चळवळीतील अप्रत्यक्ष भूमिका

भारतात परतल्यानंतर बाबासाहेबांनी सामाजिक चळवळी सुरू केल्या. १९२७ मधील महाड चवदार तळे सत्याग्रह, मंदिर प्रवेश आंदोलन, गोलमेज परिषदा इत्यादी महत्त्वाच्या घटनांमध्ये ते सक्रिय होते. या काळात त्यांना वारंवार प्रवास करावा लागत असे.
घरातील जबाबदाऱ्या पार पाडत रमाबाईंनी त्यांना मानसिक स्थैर्य दिले. सामाजिक विरोध, टीका आणि ताणतणावाच्या काळात त्यांनी धीर दिला. त्यांचा त्याग आणि संयम हा बाबासाहेबांच्या कार्याचा अदृश्य आधार होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आग्रहाखातर रमाई लिहिण्या-वाचण्यास शिकल्या. त्यानंतर बाबासाहेबांच्या सोबतीने त्यासुद्धा समाजजागृतीसाठी महिलांच्या सभांचे आयोजन करीत असत. त्यांच्या समोर भाषणे देऊन दलित चळवळीत सहभाग नोंदविण्यासाठी त्यांना प्रेरीत करीत असत. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे शिक्षण घेण्यासाठी दूरदेशी असताना रमाई आंबेडकरांनी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत गरिबीचे चटके सोसत संसार सांभाळला

माता रमाईंनी केवळ घरच नाही सांभाळलं तर त्या चळवळीतील महिलांचे गाऱ्हाणे ऐकायच्या. त्यांना मार्गदर्शन करायच्य. बाबासाहेबांच्या कार्याची त्यांना जाणीव होती आणि समजही होती. त्याकाळात अनेक महिला हे गाऱ्हाणे घेऊन येत असत की आमचा नवरा आम्हाला दारू पिऊन मारतो. तेव्हा त्या त्यांना सल्ला देत असत की तुम्ही त्यांचा मार खाऊ नका. त्यांचा प्रतिकार करा.

"इतक्यावरच त्या थांबल्या नाहीत त्यांनी ही गोष्ट बाबासाहेबांच्या कानावर घातली. ही गोष्ट आपल्याला ज्ञात आहे की बाबासाहेबांनी जेव्हा आपल्या लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली तेव्हा त्यांनी ज्या22 प्रतिज्ञा सांगितल्या त्यात दारू न पिणे ही देखील एक प्रतिज्ञा होतीच. हा संदर्भ देखील लक्षात घेणं मला आवश्यक वाटतं.

संघर्षमय जीवन जगत सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या माता रमाई आंबेडकरभीमरावांच्या क्रांतीची 'मूक' नायिका, माता रमाई आर्थिक संकटाचा सामना. बाबासाहेबांच्या प्रारंभीच्या कारकिर्दीत आर्थिक संकटे वारंवार उद्भवत असत. वकिली व्यवसायातून मिळणारे उत्पन्न अनियमित होते. सामाजिक कार्यासाठी खर्च वाढत होता. या परिस्थितीत रमाबाईंनी काटकसरीने संसार चालवला. अनेकदा स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून त्यांनी कुटुंबाच्या गरजा पूर्ण केल्या.

स्त्री-अभ्यासाच्या दृष्टीने पाहता, हा त्याग केवळ कौटुंबिक नव्हता तर राष्ट्रनिर्मिती प्रक्रियेला हातभार लावणारा होता. कारण घरातील स्थैर्यामुळेच बाबासाहेबांना समाजकार्य करता आले.

रामाईचे जीवन अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत गेले. घरात अन्नाची कमतरता, सामाजिक अपमान, आर्थिक अडचणी या सर्व संकटांमध्ये त्यांनी कधीही तक्रार केली नाही.आजच्या काळात लहानशा अडचणींनी निराश होणाऱ्या समाजाला रामाईचे जीवन सांगते की परिस्थिती कितीही कठीण असली तरी मनाने खंबीर राहणे हेच खरे सामर्थ्य आहे

वैयक्तिकदुःख आणि मानसिक बळरमाबाईंनी आयुष्यात अनेक वैयक्तिक आघात सहन केले. बाबासाहेब आणि रमाई यांना यशवंत, गंगाधर, रमेश, इंदू (मुलगी) व राजरत्न अशी एकूण पाच अपत्य झाली . यशवंतखेरीज इतर चार अपत्ये त्यांच्या वयाची दोन वर्षे पूर्ण होण्याच्या आतच दगावली ..एक आई म्हणून हे दुःख सहन करणं किती असह्य होतं, याची कल्पनाही करता येत नाही.बाबासाहेब समाजासाठी लढत होते; रमाबाई स्वतःच्या संसारासाठी आणि अस्तित्वासाठी लढत होत्या. या दुःखद घटनांनी त्यांना मानसिकरीत्या खचवण्याची शक्यता होती; तरीही त्यांनी कर्तव्यभावनेने जीवन जगले.गंगाधर यांच्या मृत्यूच्या हृदय विकाराच्या घटनेचा संदर्भ देताना बाबा साहेबांनी एकदा आपल्या मित्राला सांगितले की, जेव्हा योग्य उपचार न मिळाल्याने गंगाधर यांचे निधन झाले, तेव्हा रस्त्यावरल्या लोकांना त्याचा मृतदेह झाकण्यासाठी नवीन कपडा आणावा सांगितले, परंतु त्यांच्याकडे तेवढेही पैसे नव्हते तेव्हा रमाने तिच्या साडीमधून कापड फाडून दिला होततोच कापड मृतदेहावर गुंडाळून त्याला स्मशानभूमीत नेण्यात आला शरीर दफन केलं गेलं.बाबासाहेब अमेरिकेत उच्च शिक्षण घेत होते. 1913 ते 1917 या चार वर्षांसाठी ते अमेरिकेत राहणार होते. इकडे भारतात मात्र रमाबाईंची तारेवरची कसरत चाललेली होती. कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर होती. आर्थिक स्थितीही हलाखीची होती.त्यामुळं गर्भवती असतानाही अत्यंत कष्टाचं काम करून त्यांना उदरनिर्वाह चालवावा लागत होता. त्यामुळं शेण गोळा करून त्याच्या गोवऱ्या तयार करून त्या विकून मिळालेल्या पैशात त्या खर्च भागवत होत्या.

## सामाजिक जाणिवेची प्रेरणा

बाबासाहेबांनी रमाबाईंना लिहिलेली पत्रं अनेक पुस्तकांमधून समोर आलेली आहेत. त्यात कोलंबियातून पाठवलेल्या पहिल्या पत्राचाही उल्लेख आहे. या पत्रात बाबासाहेब म्हणतात की, "मी अमेरिकेत शिकल्यानं एक नवा इतिहास घडणार आहे. आपल्याला जो विरह सहन कराला लागणार आहे, तोच

आपल्याला महान बनवेल. अशा दुःखानं दुःखी व्हायचं नाही. रमा मी खूप पुढं जायचंठरवलं आहे. त्यात यश मिळालं तर मी दलितांची गुलामीची बंधनं तोडेन. या लढाईत तुला माझी साथ द्यावी लागेल."

या पत्राला उत्तर देतात रमाई
साहेबांच्या चरणी
रमाचा शिरसाष्टांग दंडवत,

आपलं पत्र आलं. ते वाचलं. खूप आनंद झाला. साहेब्र आमची काळजी करू नका. आम्ही सारे खुशाल आहोत. मी सांभाळते सगळं.आपलं पत्र पोयबावडीतल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांनी वाचलं. सगळ्यांना खूप आनंद झाला.कष्टाची मला चिंता नाही. माझं आपल्याशी लग्नझालं; त्याचा मला खूप गौरव वाटतो. आपण सूप शिकावं हीच माझी कामना आहे.आपण पत्रात अनेक गोष्टी लिहिल्या. मी तुमच्या पाठीशी उभी राहीन. काय वाटेल ते कष्ट करीन. पण मागं हटणार नाही. याची खात्री बाळगावी.आम्ही सर्व खुशाल आहोत असं समजा. आपण जेवण वेळच्या वेळी घ्या. तब्येतीची काळजी घ्या.यशवंताला आपलं पत्र वाचून दाखविलं. बाबा कधी येणार असं तो पुन्हा पुन्हा विचारतो. पत्र पाठवून खुशाली कळवावी.थांबते.

आपली पत्नी
सौ. रमा

रामाईंचे आयुष्य दलित समाजाच्या वेदना, अन्याय आणि संघर्षाशी जोडलेले होते. त्यांनी स्वतः दुःख सहन केले, पण समाजाच्या प्रगतीसाठी बाबासाहेबांना साथ दिली.आजच्या महिलांनी फक्त वैयक्तिक प्रगती नाही, तर सामाजिक जाणीव ठेवून समाजासाठीही कार्य केले पाहिजे — हा संदेश रमाई देतात. रमाबाई केवळ भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी नव्हत्या, तर त्यांच्या संघर्षमय प्रवासातील खंबीर आधारस्तंभ होत्यात्यांच्या संघर्षाची मूक साक्षीदार, त्यागाची प्रतिक आणि दुःख सहन करणारी क्रांतिकारक होत्या. आजच्या आधुनिक युगातही रामाईंचे जीवन स्त्रियांसाठी प्रेरणादायी दीपस्तंभ आहे. त्या भारतीय स्त्रीच्या संघर्षशीलतेचे प्रतीक होत्या. त्यांचे जीवन हे त्याग, संयम आणि निष्ठेचे उदाहरण आहे.राष्ट्रनिर्मिती प्रक्रियेत स्त्रीची भूमिका अनेकदा अप्रत्यक्ष असते. घरातील स्थैर्य, नैतिक आधार आणि मानसिक प्रेरणा यांद्वारे स्त्री समाजपरिवर्तनात योगदान देते. रमाबाईंच्या जीवनातून हे स्पष्ट होते. वंचितांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या बाबासाहेबांच्या पाठीशी त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. बाबासाहेबांची प्रेरणा, स्फुर्ती आणि लढण्याची उर्मी रमाईंचा त्यागच होता

## राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचे ऐतिहासिक मूल्यमापन

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेची निर्मिती केली, सामाजिक न्यायाची पायाभरणी केली आणि वंचित समाजाल अधिकार मिळवून दिले. या सर्व कार्यामागे रमाबाईंच्या त्यागाचा वाटा होता.इतिहासलेखनात अप्रत्यक्ष योगदानांचे मूल्यमापन करणे आवश्यक आहे. रमाबाईंच्या जीवनाचा अभ्यास केल्यास राष्ट्रनिर्मितीतील स्त्रीच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित होते.

## आजच्या महिलांनी रामाईंकडून काय शिकावे?

आत्मविश्वास , संकटात धैर्य, शिक्षणाला प्राधान्य, कुटुंबासाठी समर्पण, संयम आणि सकारात्मक विचार रामाईंचे जीवन हे केवळ इतिहास नाही, तर आजही मार्गदर्शक आहे.

## निष्कर्ष

रमाबाई आंबेडकर यांचे योगदान हे अप्रत्यक्ष असले तरी अत्यंत प्रभावी आहे. त्यांच्या त्याग, संयम आणि मानसिक आधारामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षण व सामाजिक कार्यासाठी संपूर्णपणे समर्पित होता आले.

राष्ट्रनिर्मिती प्रक्रियेत स्त्रीच्या भूमिकेचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी रमाबाईंचा अभ्यास अत्यावश्यक आहे. त्यांचे जीवन हे स्त्रीशक्तीच्या सामर्थ्याचे उदाहरण आहे.

## समारोप

डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणतातरमा, तू माझ्या आयुष्यात आली नसतीस तर? तू मनःसाथी म्हणून मिळाली नसतीस तर? तर काय झालं असतं? केवळ संसारसुखाला ध्येय समजणारी स्त्री मला सोडून गेली असती. अर्धपोटी राहणं, गोवऱ्या वेचायला जाणं, वा शेण वेचून त्याच्या गोवऱ्या थापणं किंवा गोवऱ्या थापायच्या कामावर जाणं कोणाला आवडेल? स्वयंपाकासाठी इंधन गोळा करायला जाणं मुंबईत कोण पसंत करील? घराला ठिगळं लावणं, वस्त्रांना शिवत राहणं, एवढ्याच काड्याच्या पेटीत महिना निभला पाहिजे, एवढंच धान्य, एवढंच तेलमीठ पुरलं पाहिजे हे माझ्या मुखातून बाहेर पडलेले गरिबीचे आदेश तुला गोड वाटले नसते तर? तर माझं मन फाटून गेलं असतं. माझ्या जिद्दीला तडे गेले असते. मला भरती येत गेली असती आणि तिला त्या त्या वेळी लगेच ओहोटीही लागली असती. माझ्या स्वप्नांचा खेळच पार विस्कटून गेला असता रमा! माझ्या जीवनाचा सगळा सूरच बेसूर झाला असता. सगळीच मोडतोड झाली असती.

भारतीय इतिहासात रमाबाई आंबेडकर यांचे स्थान आदरयुक्त आणि प्रेरणादायी आहे. राष्ट्रनिर्मिती ही केवळ राजकीय किंवा घटनात्मक प्रक्रिया नसून ती सामाजिक आणि कौटुंबिक आधारांवर उभी असते. रमाबाईंच्या त्यागामुळेच बाबासाहेबांचे कार्य अधिक व्यापक आणि प्रभावी ठरले.

स्त्रीच्या अप्रत्यक्ष योगदानाची दखल घेणे ही आजच्या ऐतिहासिक अभ्यासाची गरज आहे. रमाबाईंचे जीवन हे त्याग, संघर्ष आणि कर्तव्यनिष्ठेचे अजरामर उदाहरण आहे

**संदर्भ ग्रंथ**

1. डॉ बाबासाहेब आंबेडकर उर्फ भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड १ चा. भ. खैरमोडे
   मी रमाई : यशवंत मनोहर
   बाबांची रामू ज.वि. पवार
2. दैनिक सम्राट, लोकराज्य, सकाळ, लोकमत .